**<u>ठळक बातम्या</u>**

- पेट्रोल आणि डिझेलच्या दरात ३ रुपये तर सीएनजीच्या दरात २ रुपये वाढ
- नीट युजी परीक्षा आता येत्या २१ जून रोजी होणार, पुढच्या वर्षीपासून परीक्षा संगणकावर
- पश्चिम आशियात शांतता प्रस्थापित करण्यासाठी शक्य ते सर्व प्रयत्न करण्याची भारताची तयारी, देशातला राखीव तेलसाठा वाढवण्यासाठी UAE सोबत करार
- अमेरिकेच्या अध्यक्षांचा चीन दौरा पूर्ण, कुठल्याही ठोस कराराची घोषणा नाही

**आणि**

- मोसमी पाऊस येत्या २६ मे रोजी केरळात येणार असल्याचा हवामान विभागाचा अंदाज

**<><><><><>**

जागतिक स्तरावर झालेल्या इंधन दरवाढीच्या पार्श्वभूमीवर तेल कंपन्यांनी पेट्रोल आणि डिझेलच्या दरात प्रत्येकी तीन रुपयांनी वाढ केली आहे. त्यामुळे मुंबईत साध्या पेट्रोलचा दर वाढून प्रती लीटर १०६ रुपये ६८ पैसे तर डिझेलचा दर प्रती लीटर ९३ रुपये १४ पैसे झाला आहे. स्पीड पेट्रोल ११५ रुपये ७५ पैसे प्रति लीटर दराने मिळेल.

मुंबईत सीएनजीच्या दरातही प्रतिकिलो २ रुपये वाढ झाली आहे. त्यामुळे मुंबईत सीएनजीचा दर प्रतिकिलो ८४ रुपये झाला आहे.

विमानाच्या इंधनावर आकारल्या जाणाऱ्या व्हॅटमध्ये राज्यशासनानं कपात केली असून आता १८ टक्क्यांऐवजी ७ टक्के कर आकारला जाईल. हा दर येत्या १४ नोव्हेंबर पर्यंत लागू राहील.

**<><><><><>**

नाफेड आजपासून राज्यात १२ रुपये ३५ पैसे किलो दरानं कांद्याची खरेदी सुरू करणार असल्याची घोषणा केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी आज सातार्‍यात केली. प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीणच्या अंतर्गत ५ लाख घरांच्या वितरणाच्या कार्यक्रमात त्यांनी ही घोषणा केली. यावेळी प्रातिनिधीक स्वरुपात ६ लाभार्थ्यांना घराच्या चाव्या देण्यात आल्या. ऊस उत्पादक शेतकर्‍यांच्या समस्या सोडवण्यासाठी पुढच्या आठवड्यात बैठक घेण्याचं आश्वासनही त्यांनी यावेळी दिलं.

**होल्ड - चौहान बाइट**

**<><><><><>**

वैद्यकीय पदवी अभ्यासक्रम प्रवेशासाठीची नीट युजी २०२६ ही परीक्षा येत्या २१ जून रोजी पुन्हा घेतली जाणार असल्याचं राष्ट्रीय परीक्षा संस्था– NTA ने आज जाहीर केलं. विद्यार्थ्यांना १४ जून पर्यंत प्रवेशपत्रं दिली जातील. परीक्षार्थींना परीक्षा शुल्काचा परतावा दिला जाईल असं केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी आज नवी दिल्लीत वार्ताहर परिषदेत सांगितलं. नीट परीक्षा पुढच्या वर्षीपासून संगणक आधारित करण्याची घोषणा त्यांनी यावेळी केली.

**- - - होल्ड धर्मेंद्र प्रधान बाईट - - -**

एनटीएमध्ये ठोस सुधारणा करण्याची गरज असून भविष्यात कोणत्याही प्रकारच्या अनियमितता टाळण्यासाठी परीक्षा व्यवस्था अधिक मजबूत करण्यासाठी उपाययोजना करण्यात येतील, असं प्रधान यांनी सांगितलं.

**<><><><><>**

नीट यूजी २०२६ परीक्षेच्या पेपरफुटीमागे असलेल्या मुख्य सूत्रधाराची ओळख पटवण्यात सीबीआयला यश आलं आहे. दोन दिवसांपूर्वी लातूर इथून अटक झालेले पी. व्ही. कुलकर्णी हे रसायन शास्त्राचे प्राध्यापक या पेपरफुटीमागे असल्याचं सीबीआयने म्हटलं आहे. कुलकर्णी हे चार वर्षांपूर्वी लातूरच्या दयानंद महाविद्यालयातून सेवानिवृत्त झाले आहेत. नीट परीक्षेच्या रसायनशास्त्र विषयाची प्रश्नपत्रिका तयार करणाऱ्या समितीचे ते सदस्य होते. एप्रिल महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात कुलकर्णी यांनी काही विद्यार्थ्यांना पुणे इथल्या आपल्या निवासस्थानी विशेष शिकवणी दिली होती. या प्रकरणातली सहआरोपी मनीषा वाघमारे हिने विद्यार्थ्यांची जमवाजमव करण्यात कुलकर्णी यांची मदत केल्याचंही चौकशीत उघड झालं आहे. या वर्गांमध्ये सहभागी होण्यासाठी विद्यार्थ्यांनी लाखो रुपये दिले होते. या विशेष शिकवणीत विद्यार्थ्यांना प्रश्न, त्यांचे पर्याय आणि अचूक उत्तरं सांगण्यात आली. ही उत्तरं विद्यार्थ्यांनी लिहून घेतली होती आणि ती, ३ मे रोजी घेतलेल्या परीक्षेच्या मूळ प्रश्नपत्रिकेशी तंतोतंत जुळत असल्याचं सीबीआयने म्हटलं आहे.

**<><><><>**

नीट यूजी २०२६ परीक्षेच्या पेपरफुटी प्रकरणी तपास करणाऱ्या सीबीआयने आज लातूर इथल्या एका खासगी प्रशिक्षण केंद्र संचालकांची चौकशी केली. शिवराज मोटेगावकर असं या केंद्र संचालकाचं नाव आहे.

**<><><><>**

शिवसेना पक्षाचं नाव आणि पक्ष चिन्ह प्रकरणातल्या सुनावणीला विलंब होत असल्याप्रकरणी उद्धव ठाकरे यांच्या पक्षाच्या राजकीय नेत्यांकडून होत असलेल्या वक्तव्यांवरुन सर्वोच्च न्यायालयानं नाराजी व्यक्त केली आहे. एकीकडे न्यायालयाकडून पुढची तारीख मागून घेतली जाते आणि दुसरीकडे सर्वोच्च न्यायालय याप्रकरणी निकाल देत नसल्याचं वक्तव्य प्रसारमाध्यमांमध्ये काही नेते

करतात असं सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्य कांत म्हणाले. हे प्रकार सहन करुन घेतले जाणार नसल्याचंही त्यांनी स्पष्ट केलं. याप्रकरणी पुढची सुनावणी ३० जुलै रोजी होणार आहे.

**<><><><>**

विमानाच्या तिकीट दरांमध्ये सुसूत्रता आणून केंद्र सरकारने प्रवाशांना दिलासा द्यावा, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयानं केंद्र सरकारला दिले आहेत. एकाच दिवशी एकाच मार्गावर उड्डाण करणारी एक विमान कंपनी तिकीटाला एक दर आकारते तर त्याच मार्गावरच्या विमानासाठी दुसरी कंपनी वेगळा दर आकारत असल्याचं निरीक्षणही न्यायालयानं यावेळी नोंदवलं.

**<><><><>**

सर्वोच्च न्यायालयानं  दर सोमवारी आणि शुक्रवारी खटल्यांची सुनावणी दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून करण्याचा निर्णय आज घेतला आहे. इंधनबचतीसाठी हा निर्णय घेतला आहे असं सर्वोच्च न्यायालयाने प्रसिद्ध केलेल्या एका निवेदनात म्हटलं आहे. याशिवाय इतर दिवशी न्यायाधीश न्यायालयात येण्यासाठी कारपुलिंगचा वापर  करतील असंही यात नमूद केलं आहे.

**<><><><>**

नागरिकांना आणि व्यावसायिकांना सुलभ व्हावं यासाठी केंद्रीय व्यापार आणि उद्योग मंत्रालयाशी निगडीत संस्थांची कार्यालयं एकाच ठिकाणी आणण्याचा मानस केंद्रीय उद्योग आणि व्यापार मंत्री पीयूष गोयल यांनी आज मुंबईत व्यक्त केला. मुंबईत मंत्रालयाच्या विविध १२ संस्थांची २० कार्यालयं आहेत. या सर्वांना एकाच

ठिकाणी आणलं तर कामात सुसुत्रता वाढेल, नागरिकांची सोय होईल आणि पर्यावरणालाही मदत होईल, असं ते यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

पश्चिम आशियात शांतता प्रस्थापित करण्यासाठी शक्य ते सर्व प्रयत्न करण्याची तयारी भारतानं आज दाखवली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज अबुधाबीमध्ये संयुक्त अरब अमिरातीचे अध्यक्ष शेख मोहम्मद बिन झायेद अल नह्यान यांची भेट घेतली. UAE वर झालेल्या हल्ल्यांबद्दल प्रधानमंत्र्यांनी यावेळी शोक व्यक्त केला.

**होल्ड प्रधानमंत्री बाइट**

यावेळी ऊर्जा, संरक्षण आणि तंत्रज्ञान क्षेत्रात दोन्ही देशांमध्ये सामंजस्य करार झाले. भारतात ६ अब्ज डॉलरची गुंतवणूक करण्याची घोषणा UAE नं यावेळी केली. भारतात ३ कोटी बॅरल कच्च्या तेलाचा राखीव साठा निर्माण करण्यासाठी दोन्ही देशांतल्या कंपन्यांमध्ये सामंजस्य करार आज झाला. याशिवाय वायूचाही राखीव साठा निर्माण करण्यासाठी दोन्ही देश काम करणार आहेत. वाडिनारमध्ये जहाज दुरुस्ती केंद्र स्थापन करणं, जहाज दुरुस्तीसाठी मनुष्यबळाला प्रशिक्षण, सीडॅकच्यासाथीनं ८ सुपर कम्प्युटरची निर्मिती यासाठीही दोन्ही देशात करार झाले.

यानंतर प्रधानमंत्री मोदी नेदरलँड्स, स्वीडन, नॉर्वे,  आणि इटली या देशांना भेट देणार आहेत. पश्चिम आशियात शांतता नांदावी यासाठी भारत मोठी भूमिका बजावू शकतो अशी प्रतिक्रिया इराणचे परराष्ट्र मंत्री अराघाची यांनी आज नवी दिल्लीत व्यक्त केली. इराणसंदर्भातल्या कुठल्याही गोष्टीवर लष्करी मार्गानं तोडगा निघणार नसल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. अमेरिकेवर विश्वास ठेवण्याचं कुठलंही कारण इराणकडे नसल्याचं ते म्हणाले. होर्मुझच्या सामुद्रधुनीमधून सर्व जहाजांनी जाऊ

देण्याची इराणची तयारी आहे परंतु तिथली परिस्थिती किचकट असल्याचं ते म्हणाले.

<><><><><>

अमेरिका आणि चीन दरम्यान चर्चा ऐतिहासिक महत्त्वाची ठरल्याचा दावा दोन्ही देशांनी केला आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी नुकताच चीनचा दौरा केला. त्यावेळी चीनचे अध्यक्ष क्षी जिनपिंग यांच्याशी त्यांची सौहार्दपूर्ण वातावरणात चर्चा झाली. होर्मुझची सामुद्रधुनी उर्जा व्यापारासाठी मोकळी राहण्याची गरज आहे यावर त्यांचं एकमत झालं. मात्र चर्चेअंती कोणताही ठोस करार झाल्याचा उल्लेख दोन्ही नेत्यांनी केलेला नाही.

<><><><><>

यंदा केरळमध्ये नैऋत्य मोसमी पावसाचं आगमन २६ मे च्या दरम्यान होईल असा अंदाज आज हवामानखात्यानं वर्तवला आहे. साधारणपणे नैऋत्य मोसमी पाऊस केरळमध्ये एक जूनच्या दरम्यान पोचतो, गेल्यावर्षी मात्र तो २४ मे च्या दरम्यान केरळात दाखल झाला होता. यंदाही तो दरवर्षीपेक्षा लवकर केरळात पोचेल असं हवामानखात्यानं म्हटलं आहे.

<><><><><>

थायलंड खुल्या बॅडमिंटन स्पर्धेच्या पुरुष दुहेरीत भारताची सात्विक साईराज रांकीरेड्डी आणि चिराग शेट्टी ही जोडगोळी उपान्त्य फेरीत पोचली आहे. या जोडीने जपानच्या ताकुमी नोमुरा आणि युची शिमोगामी या जोडीला हरवलं. महिला एकेरीच्या उपउपान्त्य फेरीत भारताच्या पी व्ही सिंधूला आणि पुरुष एकेरीच्या उपउपांत्य फेरीत लक्ष्य सेन याला हार पत्करावी लागली.

//<><><><><>//